मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेकडून प्रभागरचनेचे काम अंतिम टप्प्यात

## वाढत्या मतदार संख्या लक्षात घेता त्यात आणखी भर पडण्याची दाट शक्यता

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून संपूर्ण शहरात चार सदस्यीय 32 प्रभाग तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. एका प्रभागात 49 हजार ते 59 हजारांचा असणार आहे. वाढत्या मतदार संख्या लक्षात घेता त्यात आणखी भर पडण्याची दाट शक्यता आहे. प्रभाग रचनेचे काम शुक्रवारी (दि.25) तयार होणार आहे, असे महापालिकेच्या अधिकार्‍यांनी स्पष्ट केले आहे.

आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांचे पथक प्रभाग रचनेचे काम करीत आहे. प्रभाग रचना तयार करण्याच्या कामाने सध्या वेग घेतला आहे. ते काम अंतिम टप्प्यात आले आहे.




शहराची सन 2011 ची जनगणना विचार घेऊन प्रत्येक प्रभागातील मतदार संख्या निश्चित करण्यात आली आहे. त्या दृष्टीने प्रगणक गट (ब्लॉक) जुळवून प्रभाग तयार करण्यात आल आहेत. गुगल अर्थ मॅपच्या आधारे नकाशे तयार करण्यात आले आहेत.

आवश्यतेनुसार प्रत्यक्ष स्थळ पाहणीही करण्यात आली आहे. प्रभाग रचनेचे काम अंतिम टप्प्यात असून, तो शुक्रवारी अंतिम केला जाणार आहे. त्या प्रारूप प्रभाग रचनेवर आयुक्तांची स्वाक्षरी झाल्यानंतर तो राज्य निवडणूक आयोगाकडे मंजुरीसाठी पाठविला जाणार आहे. त्यांच्याकडून मंजुरी मिळाल्यानंतर त्यावर हरकती व सूचनांची सुनावणी घेतली जाईल.दरम्यान, नवीन प्रभाग रचना फेब्रुवारी 2017 च्या निवडणुकीनुसार असणार असल्याचे सांगितले जात आहे.

शहरात 17 लाखांपेक्षा अधिक मतदार आहेत. त्यामुळे प्रत्येक प्रभागात मतदार संख्या वाढणार असल्याचे दिसत आहे. एक जुलै 2025 ची मतदार यादी महापालिका निवडणुकीसाठी ग्राह्य धरली जाणार आहे. त्यानुसार त्या मतदार याद्या राज्य निवडणूक आयोगाकडून मागविण्यात आल्या आहेत. मतदार याद्या प्राप्त झाल्यानंतर त्या प्रभागनिहाय फोडल्या जाणार आहेत, असे अधिकार्‍यांनी सांगितले.

प्रारूप प्रभागरचना प्रसिद्धीनंतर हरकती, सूचना

प्रारूप प्रभाग रचनेच्या मसुदा शुक्रवार (दि.25) पर्यंत तयार केला जणार आहे. आयुक्तांच्या स्वाक्षरीनंतर तो प्रारूप प्रभाग रचना राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविला जाईल. आयोगाकडून प्रभाग रचनेला मान्यता मिळाल्यानंतर प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध केली जाईल. त्यावर हरकती व सूचना स्वीकारल्या जातील. राज्य निवडणूक आयोगाने अंतिम केलेली प्रभाग रचना प्रसिद्ध होईल, असे महापालिकेचे सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांनी.

### सन 2011 लोकसंख्येनुसार प्रभागरचना

» पिंपरी-चिंचवड शहराची 2011 च्या जनगणनेनुसार लोकसंख्या 17 लाख 29 हजार 359 आहे. त्यानुसार प्रत्येक प्रभागात किमान 49 हजार आणि कमाल 59 हजार मतदार संख्येचा समावेश केला जाणार आहे. त्यानंतर 15 वर्षांत लोकसंख्येत तसेच, मतदार संख्येत मोठी वाढ झाली आहे.

# पीएमआरडीएतर्फे 166 अतिक्रमणावर कारवाई

## हिंजवडी भागातील वाहतुकीला दिलासा; अनधिकृत अतिक्रमणावर कारवाई सुरू

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे हिंजवडीसह परिसरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी ठोस कारवाई करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने गत १५ दिवसात संबंधित परिसरातील १६६ अतिक्रमणावर कारवाई करण्यात आली आहे. या भागातील सर्वच अतिक्रमणे काढण्यात येणार असून त्या दृष्टीने सर्वे सुरू आहे.

हिंजवडी - माण - मारुंजी परिसरात अतिक्रमणे वाढल्यामुळे वाहतूक कोंडी होते. परिणामी याचा वाहनधारकांसह नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. यासह काही ठिकाणी ओढे - नाल्यांचा नैसर्गिक प्रवाह रोखल्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्यात येत आहे. या भागातील अतिक्रमणविरोधी मोहिमेअंतर्गत लक्ष्मी चौक, विप्रो सर्कल, माण रोड आदी भागात पीएमआरडीएने कारवाई करत एकूण १६६ अतिक्रमणे / अनधिकृत बांधकामे काढली आहे. त्यामुळे या भागातील रहदारीला यामुळे दिलासा मिळाला आहे.

हिंजवडीसह परिसरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी अतिक्रमणावर कारवाई सुरू



आहे. या भागात सर्वे सुरू असून संबंधितांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत. त्यामुळे अनेक अतिक्रमणधारक स्वतःहून आपली अतिक्रमणे काढून घेत प्रशासनाला सहकार्य करत आहे.

उर्वरित अतिक्रमणावर निष्कासनाची कारवाई सुरू आहे. संबंधित कारवाई पीएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांच्या मार्गदर्शनाखाली अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाच्या प्रमुख डॉ. दीप्ती सूर्यवंशी, तहसीलदार आशा होळकर आणि त्यांच्या टीमच्या नेतृत्वाखाली सुरू आहे.

या भागातील काढली अतिक्रमणे

१) विप्रो सर्कल - १४

२) लक्ष्मी चौक ते मेझा नाईन - ३८

३) माण रोड परिसर - ६६

४) लक्ष्मी चौक ते मारुंजी - ७३(कार्यवाही सुरू)

५) माण गाव नाला - २८ (खोल्या निष्कासित)

६) हिंजवडी परिसरातील - १९ होल्डिंग निष्कासित

**एकूण कारवाई - १६६**

### अनधिकृत बांधकामांचे सुरू असलेले व नियोजित सर्वेची ठिकाणे

» शिवाजी चौक ते स्मशानभूमी रोड

» शिवाजी चौक ते वाकड रोड

» शिवाजी चौक ते फेज १ रोड

» हिंजवडी, माण, मारूंजीसह इतर परिसरात सर्वे सुरू

# शाळांना 10 दिवस सुट्ट्या द्याव्यात

## मंडपाचा खर्च शासनाने करावा, पुण्यातील गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा देण्याची घोषणा विधानसभेत केली. याचे लष्कर भागात विविध मंडळांनी स्वागत केले, मात्र राज्य महोत्सव होताना मंडळात दिवसरात्र राबणारे कार्यकर्त्यांच्या भावना काय आहेत, हे विचारात घेऊन हा राज्य महोत्सव होईल, अशा भावना लष्कर भागातील गणेश मंडळ कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या.



लष्कर भागातील गणेशोत्सवाला ऐतिहासिक ब्रिटिशकालीन परंपरा लाभली आहे. लष्कर भागातील जवळपास पाच मंडळे ही शंभरी पूर्ण करणारी आहेत. टिळकांनी स्वराज्यासाठी गणेशोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांची एकत्रीकरण करण्यास सुरुवात करून खऱ्या अर्थाने ब्रिटिश राजवटीविरुद्ध विरोध पुकारला. त्यानंतर गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधनाचे कार्य सुरू झाले. आणि हा उत्सव देशभर पसरला. आता तर गणेशोत्सवाची ख्याती परदेशातही पसरली आहे, खऱ्या अर्थाने पुणेकरांच्या जिव्हाळ्याचा सण म्हणजे गणेशोत्सव, या काळात सर्व मंडळांचे कार्यकर्ते अहोरात्र झटतात, नाही गेलेली कुटुंब मूळ ठिकाणी परत येते, आपले गणेशोत्सव सगळ्यात चांगला व्हावा, यासाठी मंडळातील कार्यकर्ता अहोरात्र झटतो, त्यामुळे जर राज्य सरकार गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचा दर्जा देत असेल तर हा उत्सव यशस्वी करणारे कार्यकर्ते यांचे अनुभव, त्यांची भावना, विचार शासनाने करावा, अशी मागणी लष्कर भागातील कार्यकर्ते बोलताना केली आहे.

शाळांना दहा दिवस सुट्या द्याव्यात

गुजरात, राजस्थान, पश्चिम बंगाल ही राज्ये नवरात्र उत्सवात शाळांना सुट्या देतात. याच पार्श्वभूमीवर पुणे शहर हे गजबजलेले आहे. शहरातील मुख्य ठिकाणी चालणारा गणेशोत्सव हा वाड्या-वस्त्यांचा भाग असून शहरातील वाहतूक कोंडी समस्या लक्षात घेऊन पुणे शहरातील शाळांनादेखील उत्सव काळात सुट्या जाहीर करण्याची भावना लष्कर येथील कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

लष्कर भागाला ऐतिहासिक गणेश मंडळाची परंपरा लाभली असून, लष्कर म्हणजे ब्रिटिश छावणी होत येथेच टिळकांनी येथील अनेक गणेश मंडळांची स्थापना केली आहे. अनेक मंडळे शंभरी पार केलेली आहेत. उत्सवात मंडळाचे कार्यकर्ते हे महत्वाचे आहेत, त्यामुळे शासनाने कार्यकर्त्यांच्या भावना ऐकून घ्याव्यात. तेव्हा खऱ्या अर्थाने हा उत्सव राज्य महोत्सव होईल.

### कार्यकर्त्यांचा विमा काढावा

» गणेशोत्सवातील कार्यकर्ते हे महिनाभरापासून कामाला सुट्या करून गणेशोत्सवाची तयारी करीत असतात, ह्या धावपळीदरम्यान अनेक अपघातांची शक्यता असते, दहीहंडी सणादरम्यान ज्याप्रमाणे पथकाचा विमा उतरवला जातो, त्याप्रमाणे गणेशोत्सव कार्यकर्त्यांचा विमा उतरवला जावा, अशी मागणी कार्यकर्त्यांनी केली.

### निदान मंडळाचा मंडपाचा खर्च शासनाने करावा

» गणेशोत्सव साजरा करताना गणेश कार्यकर्ता हा अनेक वेळा कर्जबाजारी होऊनही पुढल्या वर्षी त्याच जोमाने काम करतो, मात्र त्यादरम्यान सर्वच कार्यकर्त्यांवर पैशांचा अतिरिक्त बोजा येतो, त्यामुळे जर राज्य सरकार गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून साजरा करणार असेल तर निदान मंडळाचा मंडपाच्या खर्चाची जबाबदारी राज्य सरकारने उचलावी.

# नितीन गडकरी यांना 'लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार'

## टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रोहित टिळक यांची पत्रकार परिषदेत पुरस्काराची घोषणा

**पुणे | प्रतिनिधी**

लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्या (हिंद स्वराज्य संघ) वतीने देण्यात येणारा यंदाचा ४३ वा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार, केंद्रीय भूपृष्ठ मंत्री नितीन गडकरी यांना जाहीर झाला आहे. टिळक स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. रोहित टिळक यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत पुरस्काराची घोषणा केली.



शुक्रवारी (१ ऑगस्ट) टिळक स्मारक मंदिरात सकाळी १०.३० वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या उपस्थितीत पुरस्काराचे वितरण होणार असल्याचे डॉ. टिळक यांनी सांगितले.

डॉ. टिळक म्हणाले, 'लोकमान्यांच्या चतुःसूत्रीतील स्वदेशीचा स्वीकार करत गडकरी यांनी रस्त्यांच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीत मोठे कार्य सुरू केले आहे. विविध प्रकारच्या वाहन निर्मितीत स्वदेशीचा पुरस्कार व प्रसार त्यांच्याकडून होत आहे. देशाच्या विकासासाठी त्यांनी दिलेले योगदान लक्षात घेऊन त्यांची ४३ व्या लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.'

यावेळी लोकमान्य टिळक राष्ट्रीय सन्मान देऊन गौरविलेल्या आजवरच्या पुरस्कारार्थींच्या जीवन कार्याचा आढावा घेणारा इंग्रजी ग्रंथ तयार करण्यात आला आहे. या ग्रंथाचे प्रकाशन पुरस्कार वितरण सोहळ्यात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते करण्यात येणार आहे, असेही डॉ. टिळक यांनी नमूद केले.

### आतापर्यंत 'यांना' पुरस्कार

» लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार १९८३ पासून देण्यास सुरुवात झाली. पहिला पुरस्कार एस.एम. जोशी यांना हा पुरस्कार देण्यात आला असून आतापर्यंत पंतप्रधान नरेंद्र मोदी, कॉम्रेड डांगे, इंदिरा गांधी, डॉ. मनमोहन सिंग, अटलबिहारी वाजपेयी, प्रणव मुखर्जी, ज्येष्ठ नेते शरद पवार, राहुलकुमार बजाज, जी. माधवन नायर, एन. आर. नारायण मूर्ती, डॉ. शिवथाणू पिल्ले, मॉंटेकसिंग अहलुवालिया, डॉ. कोटा हरिनारायण, डॉ. के. सिवन, बाबा कल्याणी, डॉ. सायरस पुनावाला, सुधा मूर्ती यांच्यासह अन्य दिग्गजांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.

# सामान्य प्रशासनाचे तपासणी पथक कागदोपत्रीच

## भेटीच्या वेळेत बहुतांशी अधिकारी कार्यालयात हजर राहत नसल्याने नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेत प्रशासकीय राजवटीत नागरिक अनेक विभागात कामे घेऊन येतात. मात्र, आयुक्त गैरहजर असतील, तर विभागातील वरिष्ठ अधिकारी जागेवर उपस्थित नसतात. ते खुर्ची साईटवर गेल्याचे सांगत कुठेही निघून जात आहेत. याबाबत आयुक्त शेखर सिंह यांनी नागरिकांना भेटीसाठी अधिकारी उपलब्ध व्हावेत, यासाठी वेळ ठरवून दिली आहे. मात्र, आता या भेटीच्या वेळेत बहुतांशी अधिकारी कार्यालयात हजर राहत नसल्याने नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.




पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांचा प्रशासनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांवर वचकच राहिलेला दिसत नाही. महापालिकेचे अधिकारी-कर्मचारी हे कार्यालयीन वेळेत कार्यालय, टेबल सोडून इतरत्र फिरत आहेत. काही कर्मचारी हे तास न् तास उपहारगृहाजवळ फिरत असतात. त्यातच सामान्य प्रशासन विभागाच्या तपासणी पथकाची कारवाई देखील थंडावली असून हे पथक केवळ कागदोपत्रीच आहे का? असा सवाल देखील उपस्थित होत आहे.

महापालिकेचे कार्यालयीन कामकाज सकाळी दहा ते सायंकाळी पावणेसहापर्यंत सुरु असते. या वेळेत विविध कामानिमित्त शेकडो नागरिक महापालिकेच्या विविध कार्यालयात, वरिष्ठ अधिका-यांकडे येत असतात. परंतु, अधिकारी कार्यालयात गैरहजर असल्याने त्यांना भेटण्यासाठी नागरिकांना हेलपाटे मारावे लागत आहे. अधिका-यांच्या कार्यालयातील कर्मचा-यांकडून ते साईटवर, बैठकीला किंवा कार्यक्रमाला असल्याचे कारण दिले जाते.

याबाबत वारंवार तक्रारींमुळे आयुक्त शेखर सिंह यांनी नागरिकांना भेटण्यासाठी सोमवार, बुधवार आणि शुक्रवार हे तीन दिवस दुपारी तीन ते सहा ही वेळ निश्चित केली. त्यानुसार कार्यालयात नागरिकांसाठी उपलब्ध राहण्याचे निर्देश दिले.

परंतु, त्याप्रमाणे विभाग प्रमुखांसह सर्वच अधिका-यांनी आपल्या दालनाच्या दरवाजावर नागरिकांना भेटण्याच्या वेळेचे फलक लावले. पण, त्या वेळेत अधिकारी उपस्थितीत नसतात. याबाबत अनेक वेळा तोंडी आणि लेखी आदेशाद्वारे सूचना देवून वरिष्ठ अधिकारी पालन करत नसल्याचे दिसून येत आहे.

### आयुक्तच गैरहजर तेव्हा..

» महापालिकेच्या आयुक्त शेखर सिंह यांनी हे मागील आठवड्यात चार दिवसापासून कार्यालयात उपस्थित नाहीत. त्यामुळे अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, सहायक आयुक्त हे देखील कार्यालयात उपस्थित हजर राहत नाहीत. आयुक्ताकडून कार्यालयीन शिस्त आणि कामकाजाबाबत वारंवार लेखी आदेश हे विभागप्रमुखांना दिलेले आहेत. कार्यालयीन शिस्तीसाठी विभाग प्रमुखांना जबाबदार धरण्यात येईल, असेही म्हटले होते. मात्र, आयुक्त हेच सतत गैरहजर राहत असल्याने विभागप्रमुख, त्यांचे अधिकारी-कर्मचारी हेसुद्धा बेशिस्तपणे वागत आहेत.

### तपासणी पथक कुठे आहे?

» महापालिकेचे आठ क्षेत्रीय कार्यालय व इतर विभागांमध्ये सुमारे ८ हजार कर्मचारी काम करत आहेत. महानगरपालिकेच्या विविध विभागास अचानक भेट देऊन तपासणी करण्यासाठी तपासणी पथकाची स्थापना करण्यात आली आहे. जागेवर उपस्थित नसलेल्या, काम सोडून बाहेर फिरत असलेल्या, उशिराने येणाऱ्या बेशिस्त कर्मचाऱ्यांवर हे पथक कारवाई करते. मात्र, महापालिकेचे तपासणी पथक हे नेमकं काय करतेय, हेच कळायला मार्ग नाही. सामान्य प्रशासन विभागाचे तपासणी पथक आहे कुठे? असा प्रश्न देखील उपस्थित होत आहे.

### कर्मचा-याची शिस्त बिघडली..

» महापालिकेच्या अधिकारी व कर्मचा-यांची शिस्त बिघडली आहे. अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये बेशिस्तपणा वाढला आहे. आयुक्त शेखर सिंह यांचे विविध विभागावर नियंत्रण नसल्याने अधिकारी-कर्मचारी हे थंब करुन गायब होऊ लागले आहेत. कित्येक कर्मचारी कार्यालयीन वेळेत टेबल सोडून व्यक्तिगत कामानिमित्त बाहेर जात आहेत. त्यामुळे कार्यालयाची तसेच विभागाची शिस्त बिघडून प्रत्येक कर्मचारी मनमानी पध्दतीने वागू लागला आहे.

---

# आयटी पार्क 'कोंडीमुक्त'साठी अतिरिक्त 'वॉर्डन' नेमणार

## विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी हिंजवडी आयटी पार्क आणि परिसर वाहतूक कोंडीमुक्त करण्यासाठी आढावा बैठक घेतली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंजवडी आयटी पार्कमधून पुणे- पिंपरी-चिंचवड व ग्रामीण भागासह मुंबई- बंगळुरू महामार्गावर इन-आउटच्या ठिकाणी होणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी आवश्यकतेनुसार अतिरिक्त वॉर्डन नियुक्ती करण्याची मागणी वाहतूक पोलीस प्रशासनाने करावी. त्यासाठी 'पीएमआरडीए'ने मनुष्यबळ उपलब्ध करावे, असे आदेश विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले आहेत.



राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशानुसार, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी हिंजवडी आयटी पार्क आणि परिसर वाहतूक कोंडीमुक्त करण्यासाठी आढावा बैठक घेतली.

यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, 'पीएमआरडीए'चे महानगर आयुक्त योगेश म्हसे यांच्यासह महावितरण, एमआयडीसी, पीएमआरडीए, जिल्हा प्रशासन, प्रदूषण नियंत्रण महामंडळ, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पुणे प्रादेशिक परिवहन महामंडळ आदी शासकीय अस्थापनांचे अधिकारी, आयटी फोरम आणि सोसायटी फेडरेशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी "सिंगल पॉईंट ॲथॉरिटी" निश्चित केली. सर्व शासकीय विभागांमधील समन्वय हा खूप महत्त्वाचा होता. वाहतुकीला अडथळा ठरणारी अनधिकृत बांधकामे आणि पत्राशेडवर प्रशासनाने कारवाई केली. त्यामुळे रस्ते प्रशस्त होतील. बेघर झालेल्या नागरिकांना हक्काचे घर देण्याची भूमिका प्रशासनाने ठेवावी. यासोबत भूसंपादनाच्या कामाला गती द्यावी. पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करणे आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण संबंधित कामे मार्गी लावण्यासाठी 'ॲक्शन प्लॅन' तयार करावा, अशी मागणी आहे.

### विभागीय आयुक्तांनी केलेल्या सूचना...

» प्रशासकीय कामांना दिरंगाई होत असेल, तर अधिकाऱ्यांनी आपल्या स्तरावर 'ॲक्शन प्लॅन' तयार करावा.

» वाहतूक वॉर्डन मागणी केल्यानुसार, पीएमआरडीए उपलब्ध करून देईल. पुणे आणि पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तांनी तशी मागणी करावी.

» महावितरणचे ट्रान्स्फार्मर आणि ओव्हर हेड वायर वाहतुकीला अडथळा ठरत असतील, तर ते स्थलांतरीत करणे.

» वाहतूक समस्या निर्माण होणाऱ्या ठिकाणी आवश्यकतेनुसार ऐकेरी वाहतूक व्यवस्था करणे.

» भूसंपादनाचे काम गतीमान करावे. शेतकऱ्यांना विश्वासात घेणे आणि रस्त्याची जागा ताब्यात घेणे.

» पीएमपीएमएल बस थांबे योग्य ठिकाणी निश्चित करणे.

# नवीन पूल बांधायला पैसे नसतील, तर दुरुस्त तरी करा!

## पुणे जिल्ह्यातील तीर्थक्षेत्र रामदरा रस्त्यावरील जलसंपदा विभागाच्या मालकीचा सुमारे 60 वर्षे जुना पूल सध्या अतिशय धोकादायक स्थितीत आहे

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील तीर्थक्षेत्र रामदरा रस्त्यावरील जलसंपदा विभागाच्या मालकीचा सुमारे 60 वर्षे जुना पूल सध्या अतिशय धोकादायक स्थितीत आहे. नवीन पूल बांधण्यासाठी जलसंपदा विभागाकडे निधी उपलब्ध नसल्याचे कारण पुढे करून प्रशासनाने हात झटकले आहेत. पण नवीन पूल शक्य नसेल, तरी किमान सध्याच्या पुलाची तातडीने दुरुस्ती तरी करा, अशी तीव्र मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या कुंडमळा दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने 6312 पुलांची तपासणी केली असून, त्यातील 61 पूल धोकादायक ठरवून पाडण्याचे आदेश दिले आहेत; मात्र लोणी काळभोर येथील या पुलाच्या सुरक्षेबाबत कुठलीही ठोस कारवाई न केल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. पूल पडून जीवितहानी झाल्यावरच उपाययोजना होणार का? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.



### उपमुख्यमंत्र्यांचे संकेत, पण कृती कधी?

**» रविवारी पुण्यात झालेल्या बैठकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्ह्यातील धोकादायक पुलांसाठी जिल्हा नियोजन समितीकडून निधी उपलब्ध करून दुरुस्ती करण्याचे संकेत दिले. यासंदर्भात समिती स्थापनेची घोषणाही सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी अधिवेशनात केली आहे. तरी रामदरा पुलाबाबत तातडीने निर्णय घेण्याची गरज असल्याचे स्थानिकांचे मत आहे..**

रामदरा रस्त्यावरील पूल अजिबात सुरक्षित नाही, हे सर्वसामान्य नागरिकही स्पष्ट सांगतात. मात्र प्रशासनाने फक्त 'अवजड वाहतूक बंद' अशा फलकाच्या माध्यमातून पूल बंद असल्याचे दाखवले आहे. प्रत्यक्षात सर्व प्रकारची वाहतूक सुरूच आहे या पुलाची स्थिती एवढी गंभीर आहे की, स्ट्रक्चरल ऑडिट न करताही कोणीही पाहून सांगू शकतो की हा पूल धोकादायक आहे. तरीदेखील केवळ 'पूल बंद आहे' असे बोर्ड लावून प्रशासनाने जबाबदारी झटकली आहे. प्रत्यक्षात मात्र, या पुलावरून अवजड वाहनांची वाहतूक सुरूच आहे. त्यामुळे सरकारच्या उदासीनतेविषयी नागरिकांमध्ये असंतोष आहे. पुणे शहरातील पुलांच्या दुरुस्तीसाठी तत्काळ उपाय, पण आमच्या सुरक्षेबाबत दुर्लक्ष का? असा सवाल उपस्थित होत आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्ह्यातील धोकादायक पुलांसाठी जिल्हा नियोजन समितीकडून निधी उपलब्ध करून दुरुस्ती करण्याचे संकेत दिले. यासंदर्भात समिती स्थापनेची घोषणाही सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी अधिवेशनात केली आहे. तरी रामदरा पुलाबाबत तातडीने निर्णय घेण्याची गरज असल्याचे स्थानिकांचे मत आहे.

### नवीन पूल कधी? दुरुस्ती आत्ताच हवी!

**» स्थानिकांचे म्हणणे आहे की, नवीन पूल बांधण्यासाठी शासकीय प्रक्रिया पूर्ण होऊन प्रत्यक्ष काम सुरू होईपर्यंत किमान दोन वर्षांचा कालावधी जाईल. तोपर्यंत नागरिकांनी धोका पत्करून या धोकादायक पुलावरून प्रवास करायचा का? त्यामुळे तातडीने दुरुस्ती करून पूल चालू स्थितीत ठेवण्याची मागणी जोर धरत आहे.**

### प्रशासनाचे बोर्ड लावून हात झटकणे धोरण

**» रामदरा रस्त्यावरील पूल अजिबात सुरक्षित नाही, हे सर्वसामान्य नागरिकही स्पष्ट सांगतात. मात्र प्रशासनाने फक्त 'अवजड वाहतूक बंद' अशा फलकाच्या माध्यमातून पूल बंद असल्याचे दाखवले आहे. प्रत्यक्षात सर्व प्रकारची वाहतूक सुरूच आहे. धोका ओळखूनही दुर्लक्ष केल्यास संभाव्य दुर्घटनेला जबाबदार कोण?**

# आरक्षणाकडे आता डोळे; खेडमध्ये मिनी विधनसभेसाठी इच्छुकांची जोरदार मोर्चेबांधणी

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर खेड तालुक्यातील गट आणि गणांचे प्रारूप आराखडे जाहीर करण्यात आले आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर खेड तालुक्यातील गट आणि गणांचे प्रारूप आराखडे जाहीर करण्यात आले आहेत. या आराखड्यामुळे तालुक्यातील राजकीय हालचालींना वेग आला असून इच्छुक उमेदवारांनी सावधपणे मोर्चेबांधणी सुरू केली असून आता घेतलेल्या हरकतींवर तोडगा निघणार का आणि आरक्षण काय पडणार याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आपले अस्तित्व निर्माण करण्यासाठी सर्वच पक्षांचे कार्यकर्ते, माजी सदस्य आणि नवखे चेहरे नव्याने मैदानात उतरण्यास सज्ज झाले आहेत.

गट-गणांचे प्रारूप आराखडे नुकतेच जाहीर झाले आहेत. त्यानंतर आता सर्वांचं लक्ष आरक्षणाच्या अंतिम यादीकडे आहे. कारण कोणता गट महिला राखीव होईल, कोणता अनुसूचित जाती-जमातींसाठी राखीव राहील, यावर उमेदवारांची दिशा निश्चित होणार आहे. अनेक ठिकाणी इच्छुकांनी आधीच तयारी सुरू केली असली तरी, आरक्षणाचा फटका काहींना बसू शकतो, तर काही नव्या चेहऱ्यांना संधी मिळू शकते. या पार्श्वभूमीवर इच्छुकांनी जनसंपर्क मोहिमा सुरू केल्या असून, गावोगावी जाऊन कार्यकर्त्यांच्या बैठका घेतल्या जात आहेत. प्रचारासाठी सोशल मीडिया, बॅनर, पोस्टर आणि गावपातळीवरील पारंपरिक साधनांचा वापर मोठ्या प्रमाणात सुरू आहे. आधी सेवा, मग उमेदवारी या भूमिकेवर काहीजण भर देत आहेत, तर काही ठिकाणी 'ओळख' आणि 'घराणे' हेच ठराविक गटांमध्ये निर्णायक ठरत आहेत.खेड पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या विविध गटांमधील गणरचनेत यंदा काही बदल करण्यात आले.



### मैदानात कोण उतरणार...

**» आरक्षणाचा निर्णय अंतिम झाल्यानंतरच खरी राजकीय चतुर्वेधी चुरस दिसून येणार आहे. त्यानंतरच पक्षीय बैठकांना वेग, उमेदवार निश्चितीची हालचाल आणि मतदारांपर्यंत थेट पोहोचण्याच्या प्रचारयात्रा अधिक जोमात सुरू होतील. एकंदरीत, मिनी विधानसभेच्या लढाईसाठी सध्या मोर्चेबांधणी जोरात सुरू आहे,**

### सुसंवादाची किनार लाभत

**» सुसंवादाची किनार लाभत असतानाच, आता त्या अधिक स्पष्ट आणि आक्रमक होताना दिसत आहेत. त्यामुळे प्रत्येक पक्ष, गट आणि व्यक्ती यांचा कल या निवडणुकांकडे आहे. ही निवडणूक केवळ ग्रामराजकारणापुरती मर्यादित राहिलेली नसून येथूनच पुढील आमदार किंवा खासदार घडतो, अशी सर्वसामान्यांची धारणा असल्यानेच याला मिनी विधानसभा म्हटले जाते.**